# भारतीय स्त्रीया आणि राष्ट्रीय राजकारण: फुले, शाहू, आंबेडकरी दृष्टीकोण

**१) प्रा. डॉ. संजय गायकवाड**
एम. ए, एम एड. सेट, पीएच. डी.
विभाग प्रमुख, एम .एच. महाडिक आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज मोडनिंब, सोलापूर
मोबा. नं. ९४२२४६००२३

**२) मोनाली सिद्धार्थ लोंढे**
संशोधक विद्यार्थिनी
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर.
मोबा. नं. ८१४९२६०१५२
ई-मेल- emperor4475@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याची परिणीती म्हणजे ब्रिटीश सत्तेचा अंमल संपवून स्वतंत्र भारत देशाची निर्मिती होय. संसदीय लोकशाही प्रणालीचा स्विकार करून सर्व भारतीयांना न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुल्यांची हमी देणारी स्वतंत्र भारताची राज्यघटना अस्तित्त्वात आली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तथा स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना समान हक्क प्रदान करणारा हिंदू कोड बील कायदा संसदेमध्ये मांडला तेव्हा तत्कालीन प्रतिगामी मंडळींनी त्याला तीव्र विरोध करून कायदा संमत होण्यापासून रोखला. विरोधाभास हा आहे की, ब्रिटीशांच्या परतंत्र्यातून देश स्वतंत्र झाला पण स्वतंत्र भारतातील स्त्रिया या पितृसत्ताक मानसिकतेच्या पारतंत्र्यात जखडून राहिल्या. भारतीय स्त्रियांच्या बाबतीत स्वातंत्र्य व स्वातंत्र्य लढा या संकल्पनेचा विचार करता येथील विषमतेवर आधारलेली वैदिक ब्राम्हणी समाज व्यवस्था व त्या विरूध्दचा लढा या दृष्टीने पहावा लागेल. आधुनिक भारतामध्ये असा लढा फुले-शाहू-आंबेडकर यांनी उभा केला. सदर अभ्यासाचा उद्देश स्त्रिया, समाज व धर्मव्यवस्था आणि स्वातंत्र्य या संकल्पना आणि राष्ट्रीय राजकारण फुले-शाह-आंबेडकरी चळवळ यादृष्टीने समजून घेणे हा आहे.

भारतीय समाज व्यवस्था वेद, सुत्र, स्मृती या धर्मशास्त्र साहित्यातून सांगितलेल्या उतरंड्या वर्ण व जात व्यवस्थेवर आधारलेली आहे. धर्मशास्त्रांनी शुद्र, अस्पृश्य आणि स्त्रिया यांना गुलामाचा दर्जा प्रदान केला आहे. मानव हा विचारशील प्राणी आहे. विचारशीलतेला प्रवण करणारा शिक्षणाचा अधिकार, धर्मशास्त्रांनी वरील तिन्ही वर्गाला नाकारला. संपत्तीतील अधिकार नाकारून धर्मशास्त्रांनी वरील तिन्ही वर्गांना व्यक्तिगत भौतिक विकास, सुख समृध्दीपण साधण्याचा अधिकार नाकारला. भारतातील सामाजिक विषमतेला धार्मिक अधिष्ठान आहे, जोपर्यंत यात परिवर्तन होत नाही तोवर विषमता संपुष्टात येणार नाही. फुले-शाहू-आंबेडकरांनी नेमके हेच हेरून विषमतेविरूध्दची चळवळ सुरू केली ती सुधारणावादी नव्हती तर परिवर्तनवादी होती. याउलट सवर्ण पुरस्कृत सामाजिक व धार्मिक चळवळ या सुधारणावादी होत्या. धार्मिक ग्रंथांचे वर्चस्व न नाकारता सामाजिक सुधारणा घडवणे असे त्याचे स्वरूप होते.1

ब्रिटिश पारतंत्र्याने भारतीयांना आत्मपरिक्षण करण्यास भाग पाडले. सामाजिक मागासलेपण, धार्मिक रूढी-परंपरा पुरस्कृत जातीय व्यवस्था, अस्पृश्यता, स्त्रियांची गुलामगिरी, सतिप्रथा, केशवपन इ. अरिष्ठ रूढी-परंपरामध्ये सुधारणा घडवून आणणे हा कार्यक्रम सुरूवातीच्या सामाजिक सुधारणामध्ये आखण्यात आला.2 याचे आद्य पुरस्कर्ते म्हणून राजाराम मोहन रॉय यांच्याकडे पाहण्यात येते. तसेच महाराष्ट्रातील जगन्नाथ शंकर शेठ, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, दादोबा पांडुरंग तरखडकर, न्या. महादेव गोविंद रानडे, महर्षी धोंडो केशव कर्वे, गो.ग. आगरकर इ. यांनी चळवळ उभी केली. ब्राम्हो समाज, मानवधर्म समाज, परमहंस मंडळी इ. संस्थांच्या माध्यमातून चळवळ उभी झाली. लॉर्ड बेटींकच्या काळातील सतीप्रथाबंदी

कायदा, बालविवाह बंदी, विधवा विवाह प्रोत्साहन व स्त्रियांकरिता शिक्षण देणाऱ्या संस्थांची निर्मिती इ. क्षेत्रात चळवळ कार्यरत राहिली. सवर्ण पुरस्कृत चळवळीची सर्वात मोठी महत्त्वाची मर्यादा ही होती की त्यांनी विषमता शिकविणारे, पोसणारे, धर्मसाहित्य नाकारले नाही व त्यास बदलण्याचा प्रयत्नही केला नाही. ब्रिटिश पारतंत्र्याच्या आत्मपरिक्षणातून भारतामध्ये सर्वप्रथम सामाजिक व धार्मिक क्षेत्रामध्ये स्वातंत्र्याची चळवळ जी उभी झाली तिची मर्यादा आपण पाहिली. सामाजिक व धार्मिक चळवळीचा पुढचा टपा म्हणजेच राजकीय स्वातंत्र्याकरिता निर्माण झालेली चळवळ होय. या चळवळीचे नेतृत्त्व इ.स. 1885 रोजी स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय सभेने केले. भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापना कारांनी त्यांची चळवळ राजकीय प्रश्नांपुरती मर्यादित ठेवली. त्यामध्ये सामाजिक व धार्मिक प्रश्न हाताळण्याचे नाकारण्यात आले या मुद्यांवरून दोन गट पडले. राजकीय सुधारणापुर्वी सामाजिक सुधारणा झाल्या पाहिजे असा माननारा एक गट, त्याचे नेतृत्त्व न्या. महादेव गोविंद रानडे, स्वामी श्रध्दानंद सरस्वती इ. कडे होते. आधी राजकीय स्वातंत्र्य मग सामाजिक सुधाराणा मांडणारा असा दुसरा गट होता. या गटाचे नेतृत्त्व लो. बाळगंगाधर टिळकांकडे होते.3 पहिल्या गटाने भारतीय सामाजिक सभेची निर्मिती केली पण तिचे अस्तित्त्व टिकू शकले नाही कारण, दुसऱ्या गटाचा यास असणारा विरोध. स्वातंत्र्योत्तर काळात हिंदू कोड बिलाला विरोध हा केवळ राजकीय स्वातंत्र्यावर भर दिल्याचा परिणाम म्हणून आपण त्याच्याकडे पाहू शकतो. राजकीय स्वातंत्र्य मिळाले पण देशाच्या लोकसंख्येच्या अर्धा भाग असणाऱ्या स्त्रिया या गुलामच राहिल्या.

याउलट फुले-शाहू-आंबेडकरांनी सामाजिक व धार्मिक सुधारणेतून राजकीय सुधारणा हा मार्ग अवलंबिला. सर्वप्रथम त्यांनी समाजावर लादले गेलेले ब्राम्हणी वर्चस्व निर्माण करणारे, इतरांना मानवी अधिकार नाकारणारे, विषमतावादी धर्म साहित्य नाकारले. महात्मा फुले यांनी वर्णव्यवस्था ही ईश्वरनिर्मित आहे, हा दावा असत्य व फसवेगिरीचा आहे हे स्पष्ट केले.4 सतसार भाग 1 व 2 या पुस्तिकांमधून स्त्रियांच्या दर्जासंबंधी विचार मांडतांना फुले म्हणतात, इतर सर्व प्राण्यात माणूसश्रेष्ठ व माणसात स्त्री श्रेष्ठ. स्त्री ही पुरूषांप्रमाणेच निसर्गसिध्द हक्कांचा उपभोग घेण्यास लायक असतांना पुरूषप्रधान संस्कृतीतील निर्बंधांमुळे तिला मानवी हक्क उपभोगता येत नाही. हा एक प्रकारचा सामाजिक अन्यायच आहे. हिंदु धर्मशास्त्रकारांनी पुरूषांना अनेक सवलती दिल्या, पण स्त्रियांवर अनेक बंधने टाकली असे फुले म्हणतात.5

म. फुले यांनी स्त्री उद्धाराचे केवळ विचारच मांडले नाहीत तर त्यांनी त्यास कृतीची जोड दिली. याची सुरूवात त्यांनी घरातूनच केली. घरच्यांचा व समाजाचा विरोध पत्करून अशिक्षित पत्नीस शिक्षण दिले व त्यांना आधुनिक भारतातील पहिली शिक्षिका बनविले. त्यांनी मुलींसाठी (इ.स. 1848) मध्ये शाळा स्थापन केली. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा (इ.स. 1852)6 स्थापन करणारे ते भारतातील पहिले समाजसुधारक होत. विधवांच्या केशवपनाच्या विरूध्द मोहीम या सामाजिक प्रथांच्या विरोधात म्हणून मुंबईत न्हाव्यांचा संप पुकारणारे ते भारतातील आद्य सामाजिक संपकरी ठरले. विधवा व कुमारी मातांकरिता बालहत्त्या प्रतिबंध गृह (इ.स. 1863) सुरू केले. तसेच अनाथ बालिकाश्रम सुरू केले. बहुपत्नित्त्व, बालविवाह, विषमविवाह, केशवपन, नियोग, वैश्यागमन, सक्तीचे वैधव्य आदी प्रथांवर म. फुलेंनी कठोर हल्ले केले.7 हंटर कमिशन समोर (इ.स. 1882) त्यांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणासोबत इतर शैक्षणिक सुधारणा मांडल्या.8 संघटनात्मक कार्य करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली पुढे यातूनच भारतातील ब्राम्हणेत्तर चळवळीचे नेतृत्त्व उदयास आलेले आपणास दिसते. उदा. बुलढाणा जिल्ह्यातील ताराबाई शिंदे होय.

ताराबाई शिंदे या मराठा समाजातील होत्या. त्यांच्यावर सत्यशोधक समाजाचे संस्कार झालेले होते. त्यांनी इ.स. 1882 मध्ये 'स्त्री-पुरूष तुलना' या नावाचे पुस्तक लिहले यात त्यांनी पुरूष हे स्त्रीयांची कोंडी करतात यावर सटीक व सडेतोड लेखन केलेले दिसते. हिंदु धर्माचा धिक्कार करून ख्रिस्ती झालेल्या पं. रमाबाई यांच्या गौरवार्थ म. फुलेंनी 'सतशील, सत्यशोधक साध्वीनी' असा उल्लेख केलेला आहे. यातूनच पुढे सावित्रीबाईच्या विद्यार्थीनी मुक्ता साळवे निर्माण झाल्या.9 पुढे जाऊन तिने 'महार व मांग' यांच्या दैनिय अवस्थेवर भाष्य केले. मुक्ता साळवे या दलित समुहातील पहिल्या लेखिका असे मानले जाते. बुध्दिप्रामाण्यवादाच्या आधारे हिंदु धर्माच्या कर्मठपणा सोडून ख्रिस्ती धर्माचा स्विकार करणाऱ्या, धर्मांतरासारखा धाडसी निर्णय घेणाऱ्या पंडिता रमाबाई असोत, स्त्रियांची व्यथा निर्भिडपणे मांडणाऱ्या ताराबाई शिंदे असोत अथवा अस्पृश्यांच्या व्यथा अगदी

14 व्या वर्षात मांडणाऱ्या मुक्ता साळवे असो या सर्व स्वतंत्र विचारांच्या आपआपल्या क्षेत्रात नवी वाट निर्माण करणाऱ्या महिला होत्या. म. फुलेंनी सर्वांचा गौरव केला आहे व त्यांच्या पाठीशी उभे राहिले. स्वत: स्त्रियांमधून असे नेतृत्त्व निर्माण होणे यामध्ये म. फुलेंचे योगदान मोठे आहे.

म. फुलेंचा हाच वारसा पुढे कोल्हापूर संस्थानचे छत्रपती शाहू महाराज यांनी चालविला ते स्वत: राज्यकर्ते असल्याने सामाजिक सुधारणा चळवळीस राजाश्रयाचे अधिष्ठान प्राप्त झाले. छ. शाहू महाराजांनी राज्याचे कल्याणकारी धोराणांतर्गत अनेक कायद्याच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडविण्याचा मार्ग अवलंबिला.

छ. राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारे कायदे संमत केले. समाजाकडून व कुटूंबाकडून स्त्रियांची होणारी पिळवणूक थांबविण्याचा मोठा प्रयत्न केला. 11 जुलै 1917 मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात विधवा पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. याबरोबरच इ.स. 1919 मध्ये विवाहासंबंधी कायदा केला, याद्वारे आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह कायदेशीर केला. यामध्ये पुरूषाचे वय 18 तर स्त्रियांचे वय 14 करण्याचा कायदा अंमलात आणला.10 या बरोबरच 1919 मध्येच 'महिला क्रूरता प्रतिबंध कायदा' केला. समाजावर कायद्याचा वचक बसविण्याकरिता या कायद्यांतर्गत स्त्री प्रति क्रूरता करणाऱ्यास कारावास व 200 रू. दंडात्मक कारवाई करण्याचा कायदा केला. वैदिक विवाह संस्था नुसार विवाह हे दैवी मिलन आहे त्यामुळे त्याला 7 जन्माचे बंधन मानले जाते त्यात घटस्फोटाची तरतूद नाही. त्यात काही अपवादात्मक परिस्थिती वगळता स्त्रीला सर्वसामान्यपणे घटस्फोटाची तरतूद नाही. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी घटस्फोट व वारसा कायदा केला. त्यांनी राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. 12 जुलै 1919 ला छ. शाहू महाराजांनी एक क्रांतीकारी निर्णय घेतला. यामध्ये 18 वर्षापुढील मुलीला स्वत:च्या आवडीनूसार जोडीदार निवडण्याचा व लग्न करण्याची तरतूद होती. असा विवाह कायदेशीर ठरविण्यात आला. असा कायदा जाती व्यवस्थेने ग्रासलेल्या काळाच्या पुढे होता. देव-देवतांना वाहण्यात येणाऱ्या मुलींना देवदासी (जोगतीन) म्हणतात ही घाणेरडी प्रथा बंद करण्यात आली. म. फुलेंनी हंटर शिक्षण आयोगाला शिफारस केल्या प्रमाणे, पुढे छ. शाहू महाराजांनी 25 जुलै 1917 मोफत शिक्षणाचा कायदा केला. त्याप्रमाणे मुलगा व मुलगी दोघांना समान संधी उपलब्ध केली. अतिशय लहान वयात विधवा झालेल्या सून 'इंदूमती' यांना समाज व दरबारातील विरोधाची पर्वा न करता सोनतळी येथे शिक्षणाची व्यवस्था केली व त्या मॅट्रीक झाल्या. खेडोपाड्यात मुलींसाठी अनेक शाळा काढल्या. हुशार मुलींसाठी महाराजांनी शिष्यवृत्त्या ठेवल्या तसेच प्रौढ महिलांनाही शिक्षणाची सोय होती. त्यांच्यासाठी निवास व भोजनाची सोय मोफत केली. 'रखमाबाई केळवकर' यांची कन्या कृष्णाबाई केळवकर यांना महाराजांनी प्रोत्साहन देऊन मुंबई येथे वैद्यकिय शिक्षणास पाठविले. पुढील उच्चशिक्षणास इंग्लंडला पाठविले. पुढे त्यांना कोल्हापूरमध्ये अल्बर्ट एडवर्ड हॉस्पीटलमध्ये महाराजांनी नौकरी दिली.11

एवढे सगळे क्रांतीकारक कायदे कोल्हापूर संस्थानात स्वातंत्र्यपूर्व काळात केले. जे की प्रगत ब्रिटिश प्रांतात पण नव्हते. परंतु त्याच ठिकाणी स्वातंत्र्योत्तर काळात हिंदू कोड बिलास मान्यता मिळाली नाही ही एक शोकांतिकाच म्हणावी लागेल.

1920 च्या मानगाव परिषदेमध्ये छ. शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेबा आंबेडकर हे समस्त हिंदूसंस्थानचे पुढारी होतील असे मनोगत व्यक्त केले. पुढे तसेच घडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र भारताचे घटनाकार आहेत हा योगायोग नव्हे. प्रचंड विद्वत्ता, मानवता वादावरती प्रखर निष्ठा, देशातील सामाजिक आर्थिक राजकीय, धार्मिक बाबींचा सुक्ष्म अभ्यास, विषमतेविरूध्द चीड आणि शोषितांप्रती कैवार व करूणा या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जमेच्या बाजू आहेत. आपल्या सार्वजनिक जीवनात त्यांनी विविध भूमिका पार पाडल्या. ते धुरंधर राजकारणी होते, त्यासोबतच ते उत्कृष्ठ दर्जाचे अर्थतज्ञ, इतिहासतज्ञ, समाज शास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, मानववंश शास्त्रज्ञ, संरक्षणशास्त्र, पत्रकार, शिक्षणशास्त्र व कायदेपंडीत होते स्वतःला सिद्ध केलेले व एवढे अष्टपैलू असणारे त्यांच्या समकालीन क्वचितच व्यक्तीमत्त्व अस्तित्त्वात होते. म्हणूनच विविधता आणि कमालीची विषमता असणाऱ्या भारतदेशाची राज्यघटना निर्माण करण्यास पात्र असणारे ते एकमेव व्यक्तीमत्त्व ठरले.

युरोप व अमेरिकेत राज्यक्रांत्या झाल्या. तरी परंतु तेथे स्त्रियांना समान अधिकार टप्प्या-टप्प्याने प्राप्त झाले. भारतीय राज्यघटनेने स्त्री व पुरूष असा कोठेही भेदभाव केलेला नाही. कायद्यापुढे सर्व समान आहेत. सर्वांना कायद्याचे समान संरक्षण प्राप्त

आहे. स्त्रिया व बालकांच्या विकासाकरिता राज्य विशेष तरतुदी करू शकते. सर्वांना व्यक्ती स्वातंत्र्य प्राप्त आहे. स्त्रिया व बालकांच्या खरेदी-विक्रीस व शोषणास बंदी आहे.12 स्त्रिया व पुरूषांना समान कामासाठी समान वेतनाची तरतुद आहे. सर्वसामान्य स्त्रिया, गर्भवती महिला, स्तनदा माता यांना कामाच्या ठिकाणी विशेष संरक्षण व सवलती प्राप्त आहे.13 भारतातील सर्व राजकीय व प्रशासकीय पदे स्त्री व पुरूष यांच्याकरिता समानतेने उपलब आहे.

राज्यघटनेने दिलेल्या मुलभूत अधिकारांमुळे व विशेष तरतुदींमुळे आज राजयकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक इ. सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रिया आपला स्वतंत्र ठसा उमटवित आहेत. स्वतंत्र भारतातील स्त्रियांच्या बाबतीत घटनात्मक प्रावधान व त्यांच्या अंमलबजावणीमुळे सकारात्मक बदल घडून आले ही एक जमेची बाजू म्हणता येईल. याचे योगदान साहजिकच फुले, शाहू, आंबेडकर चळवळींना जाते.

वरील सकारात्मक बाबी सोबत स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर व व्यक्तीमत्त्व विकासाच्या आडवे येणाऱ्या अनेक नकारात्मक बाबी अस्तित्त्वात आहेत. पुरुषांच्या तुलनेत स्त्री शिक्षणाचे प्रमाण फारच कमी आहे. ग्रामीण भागात शाळेमध्ये केवळ पेयजल व स्वच्छ शौचालयांच्या अभावामुळे वयात आलेल्या अनेक मुलींची शाळ सुटते. घरामध्ये शौचलय नसल्याने अनेक स्त्रियांना शारिरिक आजार ग्रासत आहेत.14 कुपोषण हा अद्यापही गंभीर प्रश्न आहे. पेयजल सुविधा नसल्याने घरामध्ये पाणी भरण्याच्या कारणाने अनेक मुलींची शाळा सुटते. ग्रामीण व शहरी विभागात बालविवाहाचे प्रमाण कमी होतांना दिसत नाही. अंतराळशास्त्र या क्षेत्रात प्रगती केलेल्या देशात अद्यापही मुली व स्त्रियांकरिता सॅनिटरी नॅपकिन वापरण्याचेही प्रबोधन करणाऱ्या जाहिराती कराव्या लागतात. हा एक विरोधाभासच आहे. घरगुती व सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांवर घडणाऱ्या अत्याचार व क्रुरतेच्या घटनांच्या संख्येत वाढच होतांना दिसत आहे.

आजही संसदेत स्त्री प्रतिनिधींचे प्रमाण सरासरी 10% टक्क्यांच्या वर क्वचितच गेलेले आहे. असे असतांना मुख्यप्रवाहातील राजकीय पक्षांनी संसदेत स्त्रियांकरिता 33% आरक्षण करणारे विधायक मंजुर करण्याकडे अनेक दशके हेतू-पुरस्सर कानाडोळा केलेला आहे. स्त्रियांबाबत सोयीच्या राजकारणाचे उदाहरण घ्यावयाचे झाल्यास स्त्रियांचे तिहेरी तलाक बंदी कायद्याकडे पाहता येईल मुस्लिम समाजाकडून मागणी नसताना तथा कायदा संमत करतेवेळी समुदायातील लोकांचा विश्वास संपादन न करता कायदा केल्यामुळे या प्रक्रियेस मुसलमान समाज खास करून स्त्रिया यांच्याकडून विरोध झाला. दुसरीकडे ख्रिस्ती समाजाची मागणी असताना त्यांना अपेक्षित असलेला विवाह कायदा करण्याकडे सरकारचे दुर्लक्ष आहे हिंदू स्त्रियांना अद्याप ही पूजा अर्चा व मंदिर प्रवेशा करिता अधिकार मिळविण्याकरता संघर्ष करावा लागतो हे सबरीमला व शनिशिंगनापूरच्या उदाहरणातून पहाव्यास मिळते. यातून मुख्य प्रवाहातील राजकीय पक्षांची पुरूषप्रधान मानसिकताच प्रकट होते.

महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्याची चळवळ अहिंसक मार्गाने लढविली. त्यामुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्य लढ्यातील सहभागाच्या दृष्टीने पोषक वातावरण निर्माण झाले. या कारणास्तव स्वातंत्र्यचळवळीत स्त्रियांचा सहभाग वाढला. याचे श्रेय महात्मा गांधीजींना जाते, हे वास्तव असले तरी महात्मा गांधीजींनी वर्णावर आधारित विषमतावादी, वैदिक समाजव्यवस्थेचा पुरस्कार केला.15 याच व्यवस्थेने स्त्रियांना गुलामगिरीत ढकलले आहे. सामाजिक जीवनात एक व राजकीय जीवनात एक अशा दुहेरी भुमिकेमुळे स्त्रिया, शुद्र, अस्पृश्य व आदिवासी यांच्या सर्वांगिण विकास होवू शकला नाही. सामाजिक व धार्मिक परिवर्तनाचा मुद्दा वगळून राजकारण करण्याच्या मुख्य प्रवाहातील राजकीय पक्षांच्या भूमिकेमुळे आज अनेक सामाजिक, आर्थिक व धार्मिक प्रश्न गुंतागुंतीचे होवून बसले आहेत.

जन्मदाती, मायाळु, ममत्व जपणारी, दयाळू, अन्नपूर्णा आणि हळव्या मनाची असणारी स्त्री, या घटकाच्या बाबतीत देशामध्ये इतके गंभीर प्रश्न अस्तित्त्वात असताना याचं भान समाजाकडे आहे की नाही अशी परिस्थिती आहे. निवडणुका आल्या की, धार्मिक तेढ, जातीय तेढ आणि त्यातून निर्माण होणारी हिंसक परिस्थिती यामुळे देशात अराजक व अस्थिरतेचे वातावरण निर्माण झालेले असते. राजकिय हिंसाचाराने समाज अविवेकी बनतो. अविवेकाने संवेदनशिलता संपून जाते. अविवेकी व असंवेदनशिल समाजाकडून स्त्रियांच्या विकासाच्या दृष्टीने पोषक सामाजिक व धार्मिक परिवर्तनाची अपेक्षा कशी बाळगायची? हा खरा राष्ट्रीय प्रश्न आहे. मागील दशक भराच्या राष्ट्रीय राजकारणामध्ये हिंदू राष्ट्र निर्माण करण्यासाठी चढा ओढ लागली आहे मी

खरा हिंदू हे ठासून सांगण्याची स्पर्धा लागलेलीआहे. अशा परिस्थितीत हिंदुराष्ट्रात स्त्रियांचे स्थान भारतीय राज्यघटनेत सांगितलेल्या समतेवर आधारलेले असणार आहे की मनुस्मृतीने सांगितलेल्या गुलामगिरीवर आधारलेले असणार आहे? जर मनुस्मृतीची गुलामगिरी स्त्रियांवर लादली जाणार असेल तर त्या विरोधात सर्व संविधानवादी स्त्रिया पूर्ण शक्तीनिशी त्याच्या विरोधात दंड थोपटून उभ्या राहतील का? हा दुसरा महत्त्वाचा राष्ट्रीय प्रश्न आहे. या प्रश्नाच्या उत्तरात भारतीय स्त्रियांचे भविष्य दडलेले आहे.

**निष्कर्ष:-**

स्त्रियांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य तेंव्हाच मिळेल जेव्हा विषमता निर्माण करणारे धर्मशास्त्रात एकतर परिवर्तन होईल अथवा त्यांना नाकारण्यात येईल. इतिहास पाहता हे कार्य करण्याची मानसिकता सवर्ण पुरस्कृत कोणत्याही राजकीय पक्षामध्ये नाही, तर हा लढा फुले-शाहु-आंबेडकर यांच्या विचाराने व मार्गाने यशस्वी होवू शकतो. हे वास्तव नाकारता येणार नाही. देशाच्या अर्ध्या लोकसंख्येस अविकसित ठेवून कोणत्याच देशाचा विकास साधला जावू शकत नाही. त्याला भारत देश कसा अपवाद असेल?

**संदर्भ :**

1. गाठाळ एस.एस. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, 2021, औरंगाबाद पान 180-81.
2. कित्ता, पान 64-119.
3. आंबेडकर भिमराव रामजी, काँग्रेस आणि गांधीनी अस्पृश्यांप्रती काय केले? क्षितीज पब्लिकेशन 1995, नागपूर, पान 37-55.
4. कित्ता, गाठाळ एस.एस, पान 163.
5. कित्ता, पान 161.
6. कीर धनंजय महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन 1968, मुंबई पान क्र. 43-71.
7. कित्ता, गाठाळ एस.एस. पान 152-188.
8. कीर धनंजय, माळशे स.गं., फडके य.दि. महात्मा फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ, 1969, मुंबई पान क्र . 239-254.
9. नरके हरी संपादित महात्मा फुले: शोधाच्या नव्या वाटा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीराव फुले व राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, 2006, मुंबई.
10. जाधव रमेश संपादित राजर्षी शाहू गौरव ग्रंथ महाराष्ट्र शासन राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, 2016, मुंबई पान क्र. 819-834.
11. कित्ता, पान क्र. 819-834.
12. लक्ष्मीकांत एम. इंडियन पॉलिटी, के. सागर पब्लिकेशन, 2017, पुणे पान क्र. 79-107.
13. कित्ता, पान क्र. 108-117.
14. 2020 GAG अहवाल https://www.news18.com/news/mission-paani/focus-on-toilets-key-to-reducing-school-dropout-rate-among-girls-4822169.html.
15. कित्ता, काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांसाठी काय केले? पान क्र. 273-276.